ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | स्त्रियांवरिल लैंगिक अत्याचार : एक ज्वलंत सामाजिक समस्या<br>**डॉ. कन्नाडे ममता कार्तिक** | १-५ |
| २ | २१ व्या शतकात गोपाळ गणेश आगरकरांच्या शैक्षणिक विचारांची प्रस्तुतता<br>**प्रा. सुरेश नामदेव दांडगे** | ६-१० |
| ३ | बी.एड. छात्राध्यापिकांची स्त्रियांच्या लैंगिक छळाबाबतची जाणीव जागृती एक अभ्यास<br>**डॉ. नवनाथ ज्ञानदेव इंदलकर** | ११-१६ |
| 4 | Information Technology and Teaching Learning Process (Education)<br>**डॉ. सर्जेराव पांडुरंग चव्हाण** | १७-२२ |
| ५ | नवीन सामाजिक समस्या ताणतणाव<br>**सहा. प्रा. किरण अशोक आबनावे**<br>**डॉ. आर. बी. व्हनबट्टे** | २३-२६ |
| ६ | भारतीय शेती समोरील आव्हाने व उपाययोजना एक अभ्यास<br>**डॉ. ओ. जी. मगदूम** | २७-३४ |
| ७ | आर्थिक विकासात माहिती तंत्रज्ञान उद्योगांचे योगदान<br>**प्रा. डॉ. के. डी. पाटील** | ३५-३८ |
| ८ | शिक्षक उत्तरदायित्व : पार्श्वभूमी, संकल्पना व वैशिष्ट्ये<br>**डॉ. शिंदे भागवत असाराम** | ३९-४२ |
| ९ | महाराष्ट्रातील आधुनिक विवाह पध्दतीतून वाढते घटस्फोट : एक सामाजिक समस्या<br>**डॉ. शैलजा का. माने** | ४३-४८ |
| १० | लोकशाही संस्थांची विश्वसनियता<br>**प्रा. डॉ. सुनिल संभाजी साठे**<br>**प्रा. रुपेश रमेश जाधव** | ४९-५२ |
| ११ | भारतातील उच्च शिक्षणातील समस्या व आव्हाने<br>**प्रा. बी. आर. नदाफ** | ५३-५६ |
| १२ | भारतातील विद्यापीठाची सद्यस्थिती आणि उच्च शिक्षणातील समस्या<br>**प्रा. किशोर सुतार**<br>**प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे** | ५७-६६ |

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १. स्त्रियांवरिल लैंगिक अत्याचार : एक ज्वलंत सामाजिक समस्या

**डॉ. कन्नाडे ममता कार्तिक**
समाजशास्त्र विभागप्रमुख, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

सामाजिक समस्या या मानवी संबधाशी संबधीत असलेली बाब आहे. ज्यावेळी मानवाचे वैयक्तिक आणि सामाजिक वर्तन हे समाजाने स्वीकारलेली व आत्मसात केलेली मूल्ये, नियमने आणि उद्दिष्टे यांच्याशी विसंगत होते, तेव्हा सामाजिक समस्या निर्माण होतात.

लैंगिक अत्याचार (बलात्कार) हे देखील स्त्रियांवरील अत्याचाराचे एक गंभीर रूप आहे. एक ज्वलंत सामाजिक समस्या म्हणून या प्रश्नाकडे पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. स्त्रियावरील अत्याचाराचा सर्वाधिक गंभीर स्वरूपाचा प्रकार म्हणजे लैंगिक अत्याचार होय. भारतीय दंड संहिता (IPC) कलम 375 मध्ये बलात्काराची व्याख्या करण्यात आली. या व्याख्येनुसार स्त्रीच्या योनी, गुदद्वार, मूत्रनळी किंवा तोंड यामध्ये लिंग किंवा शरीराचा लिंगाव्यतिरिक्त कोणताही इतर अवयव किवा वस्तू घालणे, स्त्रीच्या योनीमध्ये लिंगप्रवेश होईल या हेतूने व तशा पध्दतीने स्वतःच्या शरीराचा पवित्रा घेणे किंवा तिला तसा पवित्रा घेण्यास भाग पाडणे, वर सांगितलेल्या अवयवांना तोंडाने स्पर्श करणे, वरील प्रकारची कृत्ये त्याच्याबरोबर किंवा इतर कोणाबरोबर करण्यास तिला भाग पाडणे तसेच ही कृत्ये पीडित स्त्रीच्या समंतीशिवाय, तिच्या मर्जीविरूध्द करणे याला बलात्कार म्हटलेले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

1. स्त्रियांवरिल लैंगिक अत्याचार संदर्भात समाजातील स्थितीचा अभ्यास करणे.
2. लैंगिक अत्याचार कमी करण्यासाठी उपाययोजना सूचविणे

संशोधन पध्दती प्रस्तुत षोधनिबंध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटद्वारे माहिती गोळा करून विश्लेशण करण्याचा प्रयत्न केला आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीनुसार 2012 च्या आकडेवारीनुसार देशभरामध्ये स्त्रियावरील बलात्काराचे एकूण 24 हजार 923 गुन्हे नोंदविण्यास आले तर आक्टोंबर 2013 पर्यंत ती संख्या 125 टक्यांनी वाढली. ही आकडेवारी अचानक वाढलेली नाही तर डिसेंबर 2012 मधील निर्भया बलात्काराच्या निर्घृण प्रकरणानंतर देषभरामध्ये लैंगिक अत्याचारा विरोधात तीव्र संतापाची भावना समाजात दिसून आली परिणामी अत्याचाराविरोधात उघडपणे बोलण्याचे, दाद मागण्याचे धाडसही स्त्रियामध्ये वाढले.

युनिसेफ ने 2005 ते 2013 या काळात भारतात केलेल्या सर्वेक्षणानुसार 10 ते 15 वर्ष वयोगटातील 10 टक्के मुलींना तर 15 ते 19 वर्ष वयोगटातील 30 टक्के मुलींना कुठल्या ना कुठल्या प्रकारच्या लैंगिक आणि शारीरिक हिंसेला सामारे जावे लागते असे स्पष्ट केले.